# गिरगावमध्ये प्रकल्पबाधितांसाठी उभे राहणार ४८ मजली टॉवर

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यानच्या गिरगाव येथील प्रकल्पबाधितांसाठी एकूण ४८ मजल्यांचे टॉवर उभे राहणार असून प्रकल्पबाधितांच्या या इमारतीच्या बांधकामासाठी अनेक कंपन्यांकडून भरघोस प्रतिसाद मिळाल्याचे एमएमआरसीएलने स्पष्ट केले आहे.

एमएमआरसीएलने मागवलेल्या पूर्व अर्हता निविदेत बांधकाम क्षेत्रातील जेएमसी प्रोजेक्ट (इंडिया), टाटा प्रोजेक्टस लिमिटेड, एल अँड टी लिमिटेड, वास्कॉन इंजिनीयरिंग लिमिटेड, शापूरजी पालनजी अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, मोंटोकारलो लिमिटेड, कॅपसाइट इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड, न्याती इंजिनीयर्स अँड कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड, मॅन इन्फ्रा कन्स्ट्रक्शन लिमिटेड व नाथानी पारेख कन्स्ट्रक्शन लिमिटेड आदींचा समावेश आहे. एमएमआरसीएलकडून पूर्व अर्हता प्रक्रियेमार्फत निवडलेल्या कंपन्यांद्वारे निविदा मागवण्यात येतील. गिरगाव पुनर्विकास इमारतीमध्ये ४७३ रहिवासी सदनिका, १३७ व्यावसायिक आस्थापना व १९ व्यावसायिक कार्यालयाचा समावेश राहील.

या ४८ मजली इमारतीचे तीन अधिक तळ मजले सेवा तसेच पार्किंगसाठी राखीव असतील व ग्राऊंड लेव्हल, एक ते सात मजले अंशतः व्यावसायिक गाळे व सेवा देण्यासाठी राखीव असतील. आठ ते नऊ मजले व्यावसायिक गाळे, सेवा तसेच सुविधांसाठी राखीव असतील. १० ते १८ मजल्यांवर व्यावसायिक गाळे तसेच सदनिका असतील व १९ ते ४८ मजल्यांवर रहिवासी सदनिका असतील. या इमारतीस कार पार्किंगची सुविधा तसेच बगिचा आदी सुविधा राहतील. एकूण ४८ मजल्यांपैकी ३९ मजले रहिवासी सदनिकांसाठी राखीव असतील.

काळबादेवी गिरगाव पुनर्वसन आराखड्याअंतर्गत ६ वेगवेगळ्या भूखंडांचे एकत्रितरीत्या विकास केल्या जाणार आहेत. एकूण ६ भूखंडांपैकी के२, के३, जी३ हे भूखंड एकात्मिकरीत्या विकसित केले जातील, तर के१, जी १ व जी२ हे भूखंड मेट्रोसंबंधी कामांसाठी वापरण्यात येणार आहेत. एमएमआरसीएल के३ ही इमारत बांधण्यासाठी मे. वास्कॉन या कंपनीची आधीच निवड झाली असून या इमारतीचे बांधकाम लवकरच सुरू होणार आहे.

याबाबत एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक, रणजीतसिंह देओल म्हणाले, या कामासाठी विविध कंपन्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला याचा आनंद आहे. या पुनर्विकसित इमारती काळबादेवी व गिरगाव भूमिगत मेट्रो स्थानकाच्या संलग्न बांधण्यात येणार असल्याने हा पुनर्विकासाचा आराखडा खूप महत्त्वाचा आहे. काळबादेवी व गिरगाव येथील बरेच भूखंड लहान आहेत व रस्ता रुंदीकरणामुळे व नवीन डीसीपीआरप्रमाणे तेथे विकास होणे अशक्य होते. मात्र या प्रकल्पाच्या यशामुळे या भागात अनेक सामूहिक विकासाला चालना मिळेल, असेही रणजीतसिंह देओल म्हणाले.